# ।। अथ पराभक्ति को अंग ।।
## मारवाडी + मराठी
## सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ पराभक्तिच्या अंगाच्या अर्थाचे भाषांतर प्रारंभ ।।

परा भक्त जाहाँ ऊदत ।। ताँही ऐसा लछ होई ।।
भजण भाव नही ज्ञान ।। सोच नही सांसो कोई ।।
सुख दु:ख एक समान ।। नही सिसकारो आवे ।।
तीन लोक की गम ।। आर पईसे भर पावे ।।
केस नख नही सुधरे ।। जीभ स्वाद नही कोय ।।
परा भक्त सुखराम के ।। ज्याहाँ ऐसा लछ जोय ।।१।।

जेव्हा भक्तामध्ये पराभक्ती म्हणजे होणकाळाच्या पलिकडील सतस्वरुपाची पूर्ण स्थिती उदय होते तेव्हा त्याच्या आधीचे ब्रम्ह–मायाचे भजन भाव व ज्ञान नष्ट होऊन जाते, अशा भक्ताला मायेच्या सुखांची व काळाच्या दु:खांची फिकीर राहत नाही. त्याला तन व मनाचे होणारे मायेचे सुख व काळाचे दु:ख दोन्ही सारखे दिसतात.त्या दु:खांना पाहून तो चमकत नाही किंवा बिंबरत नाही.त्याला तीन लोकांच्या सुख व दु:खांची मर्यादा समजत राहते.त्याचे भोजन खुराक एक पैसाभर होऊन जाते म्हणजे त्याचा आहार खूप कमी होऊन जातो.त्याला त्याचे केस विंचरणे,नख कापणे इ.वस्तूंची काही शुध्द राहत नाही म्हणजे शरीर सजवण्याची जराही शुध्द राहत नाही.त्याला जगातील लोकांसारखे कोणत्या प्रकारचा जिभेचा स्वाद राहत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याच्यात पराभक्ती म्हणजे सतस्वरुपाची भक्ती उदित होते त्याच्यात कुद्रती हे लक्षण येतात. ।।१।।

लागे ब्रम्ह समांद ।। देहे की सुध न कोई ।।
पाँचूं गया बिलाय ।। म्हो मासो नही लोई ।।
करामात करतूत ।। सकळ कूं दूर बिडारी ।।
मन सो गयो बिलाय ।। देव बंदत है लारी ।।
परा भक्त ज्यांहां ऊपजे ।। दुनिया सकेन मांन ।।
कोई ज्ञानी सुखराम के ।। लछ पिछाणे आन ।।२।।

त्याला सतस्वरुप ब्रम्हची समाधी लागते.समाधी अवस्थेत त्याला देह व जगाची शुध्द राहत नाही.त्याच्या पाची विषय वासना पूर्णत: नष्ट झालेल्या राहतात.त्याचे आई, वडील,पत्नी,पुत्र,धन,राज्य इ.कोणाशीही मासाभर ही मोह राहत नाही.त्याला मायेचे चमत्कार,करामात,करतूत आवडत नाहीत याकारणाने तो चमत्कार,करामात,करतूत या सर्व वस्तूंना स्वत:पासून दूर ठेवतो.त्याचे त्रिगुणी मायेच्या सुखांमध्ये रमणारे मन पूर्ण नाश झालेले राहते.त्याची स्वर्गादिकाचे सर्व छोट्यांपासून मोठे देवता महिमा करतात व दर्शन घेऊन घेऊन दंडवत प्रणाम करतात.अशा पराभक्ताला तीन लोक चवदा भवनाचे

सर्व देवता श्रेष्ठ जाणतात परंतु जगातील स्त्री–पुरुष त्याला ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती, अवतार इत्यादी पेक्षा श्रेष्ठ आहे हे मानत नाही,उलट आपल्या बरोबरीचा मनुष्य समजतात.त्या भक्ताला सतस्वरुप समजवाला जगात जो एखादा ज्ञानी राहतो,तोच त्याचे माया–ब्रम्हच्या पलिकडील अजब लक्षण पाहून ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,अवतार व माया–ब्रम्ह या सर्वांच्या पलिकडे सतस्वरुप अवतार आहे असा पाहतो. ।।२।।

परा भक्त के नेम पेम ।। किरीया नही कोई ।।
कूँची मुद्रा जोग ।। जाप साझन नही होई ।।
हरक कोऊ नही सोग ।। करम अेको नही बंधे ।।
गुण इंद्रि सब जीत ।। सुरत साहेब दिस सेधे ।।
आया कूं मेटे नही ।। लेण काहुँ नही जाय ।।
अे लछण सुखराम के ।। परा भक्त ज्याँहा क्वाय ।।३।।

अशा पराभक्तामध्ये ब्रम्हा,विष्णू,महादेव,अवतार इ.मायेच्या भक्तां सारखे कर्माचे नियम कर्माशी प्रेम व कर्म क्रिया राहत नाही.ते कर्माचे नियम,प्रेम व क्रियेच्या पलिकडे राहतात.ते योगाची किल्ली,खेचरी,भुचरी,अगोचरी,चराचरी मुद्रांच्या साधना तसेच अशा मायेच्या एक ही क्रिया साधत नाही.त्यांना मायेच्या कोणत्या गोष्टीने हर्ष होत नाही किंवा त्यांना मायेच्या कोणत्या गोष्टीने उदासी येत नाही.ते ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,अवतार इ. कोणत्या देवी देवतांचे कर्म बांधत नाही.त्याच्या घटात उपजलेल्या रजोगुण,तमोगुण तसेच पाच विषय नाश झालेले राहते व त्यांची सुरत अष्टोप्रहर साहेबात लागलेली राहते. त्यांच्यावर कोणतेही संकट आले तरीही ते आलेले संकट स्थिर होऊन झेलतात.त्या संकटांना मिटविण्याची ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती इ.मायेची कोणती विधी करीत नाही तसेच अधिक सुख प्राप्ती करीता कोणती मायेची विधी साधत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,ज्याच्यात पराभक्ती उदित होते,त्यांच्यात हे सर्व लक्षण कुद्रती प्रगट होतात. ।।३।।

जात पांत कुळ नाही ।। निरख बंदे नही निंदे ।।
बिन सतगुरु कहुँ जाय ।। साध कोई नही बंदे ।।
ध्रम क्रम सुण पाप ।। करत देखे जुग मांही ।।
सरस निरस नही होय ।। बंदे निंदे जुग नाही ।।
अदभुत चालज अगम हे ।। मो पे कही न जाय ।।
परम भक्त सुखराम के ।। केवळ सम कहाय ।।४।।

अशा भक्ताला आपल्या देहाची जात,पात,कुळ ही मर्यादा राहत नाही.त्याला सर्व जगत आपली जात–पात,कुळाचा म्हणजे आपल्या हंसाच्या मूळ ब्रम्ह जातीचा दिसतो.त्याला

सर्व ब्रम्ह दिसतात म्हणून जगात कोणीही मनुष्य वंदनीय किंवा निंदनीय आहे असे वाटत नाही म्हणून तो कोणाची वंदना करीत नाही किंवा कोणाची निंदा करीत नाही. त्याला जगातील सर्व देवी–देवता,साधू संत रामजी व सतगुरुचे सुख देण्याच्या पराक्रमाच्या समोर जराही पराक्रमी दिसत नाही.ते जगातील ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुष, ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,अवतार इत्यादी देवतांचे पुण्य,धर्म,कर्म करतांना पाहतो व तसेच विषय विकारांमध्ये व राक्षसी देवतांमध्ये पाप करतांना पाहतो परंतु ते उच्च कर्म करणारे ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुषांची महिमा करीत नाही व नीच कर्म करणाऱ्या नरकीय जीवांची निंदा करीत नाही,अशी त्याची चाल अद्भूत असते,समजण्याच्या पलिकडे अगम असते.ती चाल मला शब्दांमध्ये वर्णन करता येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे हे परमभक्त जसे सतस्वरुप केवल आहे,तसेच्या तसे आहे.या भक्तांमध्ये व साक्षात केवलमध्ये जरासे ही अंतर नाही. ।।४।।

**परा सो भक्त तिण पुरूष कूं ऊपजे ।। तांहिका अंग अे लछ होई ।।**
**त्याग बेराग मेमंत मस्तान रे ।। ब्रम्ह की दिष सब मंड जोई ।।**
**भाव प्रभाव प्रमात्मा आतमा ।। अेक सूं दुसरो नाय जाने ।।**
**सुभ असुभ ऊपाय संसार मे ।। आप ही आपको ख्याल ठाने ।।**
**नही हरष सोग संसार मे रेत हे ।। उलट ब्रम्हंड मे जाय बेठा ।।**
**दास सुखराम के पराँ ज्याँहाँ ऊपजे ।। तीन तज ताप कूं होय सेंटा ।।५।।**

त्यांना त्रिगुणी मायेपासून उपजलेल्या सुखांमध्ये जराही प्रीति राहत नाही म्हणून या सर्व सुखांशी त्यांचा त्याग राहतो.त्यांना वैराग्य राहते व ते सतस्वरुप ज्ञान वैराग्याच्या सुखामध्ये मदोन्मत्त होऊन मस्त राहतात.ते सर्व सृष्टीला सतस्वरुप ब्रम्हमय सृष्टी समजून सर्वत्र सतस्वरुपी ब्रम्हच ब्रम्ह आहे असे पाहतात.त्यांना कोण्या जीवाच्या प्रति उच्च भाव किंवा निचभाव राहत नाही.त्यांच्यात माझा आत्मा व दुसऱ्याचा आत्मा असा वेगळा भाव राहत नाही.त्यांच्यात मी आणि तू अशी विषम समज राहत नाही.त्यांना सर्व सम दिसतात.एक व दुसरा जीव असे वेगळे वेगळे कधी दिसत नाही.ते मायेचे सुख प्राप्त करण्याकरीता जगातील शुभ किंवा अशुभ अशी कोणती मायेची रीत साधत नाही.ते स्वत:मध्ये प्रगट झालेल्या सतस्वरुप ब्रम्हमध्ये खुश राहतात.ते संसारात राहतात परंतु त्यांना मायेच्या सुखाशी हर्ष राहत नाही व दु:खाशी उदास राहत नाही.ते संसारात शरीराने रमतांना दिसतात परंतु त्यांचा हंस घटात बंकनाळेने उलटून सतस्वरुप ब्रम्हंड मध्ये रमत राहतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याला पराभक्ती उपजते,ते तन,मन व येऊन येऊन पडणाऱ्या दु:खांना जराही धारत नाही.ते साहेबाच्या दिशेत जराही कमजोरी न ठेवता मजबूत होऊन राहतात. ।।५।।

रेखता ।।

अन्न मुख मांही कौ देत हे ग्रास कूं ।। नीर जळ पाविया पीत पावे ।।
कपड़ा आण ओढाय कौ ले चले ।। रीज ना रीस दिल माही आवे ।।
देहे भ्रळाट मुख बेण सो स्वावणा ।। लोक तिहूं सरब सो लांघ बोले ।।
पवन के ऊपरे गिगन मे घर करे ।। जाय अस्मान की पोळ खोले ।।
चंद नही सूर कौ रात नही दिन हे ।। करम की रेख पर मेख मारी ।।
दास सुखराम के लछ ये जानीयो ।। परा सत्त भक्त हे एम सारी ।।६।।

त्यांच्या मुखात कोणी अन्न ग्रास दिला तर ते खाऊन घेतात तसेच कोणी पाणी पाजले तर पिऊन घेतात.त्यांना थंड किंवा गरमची शुध्द राहत नाही.ते समाधी अवस्थेत बसतात किंवा शरीर धरतीवर टाकून लेटलेले राहतात.थंडीत कोणी कपडा पांघरुन दिला तर पांघरुन घेतात व तोच कपडा थंडीत कोणी काढून घेतला तर काढणाऱ्यांना मना करीत नाही व गर्मीत कोणी कुलर,पंखा लाऊन दिला तर खुश होत नाही किंवा तेच कुलर,पंखा बंद करुन दिले तर बंद करणाऱ्यांवर नाराज होत नाही.अशा प्रकारे त्यांच्या सोबत चांगले वर्तन करा किंवा वाईट वर्तन करा,त्यांना कोणावर खुशी होत नाही किंवा कोणावर नाराजी येत नाही.त्यांचा देह सतस्वरुप आनंदाने झळकत राहतो व त्यांच्या मुखातून निघणारे प्रत्येक वचन,वाक्य ऐकणाऱ्या श्रोत्याला प्रिय वाटतात,गोड वाटतात व ते तीन लोक चवदा भवनाच्या पलिकडील चौथ्या लोकाचे ज्ञान बोलतात.ते पारब्रम्हच्या सोहम स्थानाच्या पलिकडे सतस्वरुप गगनात घर करतात व ते समाधीत सतस्वरुप देशात जातात.त्या सतस्वरुपाच्या देशात येथल्या सारखे चंद्र,सूर्य,रात्रं, दिवस इत्यादी काही राहत नाही.तेथे नेहमी एक सारखा सुहावना प्रकाश असतो.ते दहाव्याद्वारात संचित कर्म नष्ट करतात व सर्व काळ कर्म नष्ट करुन माया–ब्रम्हची सत्ता सदा करीता नष्ट करुन देतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,ज्या भक्तात हे लक्षण प्रगट होतात तोच खरा पराभक्त आहे असे जाणा. ।।६।।

च्यार सो ग्यान ऊर माँही जो ऊपजे ।। पांचवे ज्ञान की गम नाही ।।
तांह लग पेम ऊपाय की भक्त हे ।। मून गेहे प्रेम ठेराय माँही ।।
लछ सूं मन सूं खेंच ऊर धारीयो ।। चाल अर हाल अरू घेर लावे ।।
परा सो भक्त तिण पूरूष कूं ऊपजे ।। पेल सब मन की बास जावे ।।
पाँच सो इंद्रियाँ जीवती तन में ।। ऊलट घर आद मे नांही पेठा ।।
दास सुखराम के तांहि लग अंग रे ।। ज्ञान मे सांभळी धार बेठा ।।७।।

ज्या हंसाच्या उरात मायेचे मतज्ञान,श्रृतज्ञान,अवधीज्ञान,मनपर्चेज्ञान असे चार ज्ञान उपजले आहे परंतु पाचवे कैवल्य ज्ञान उपजले नाही तो पर्यंत त्याच्यात मोह मायेचेच

ज्ञान उपजले आहे,वैराग्य कैवल्य ज्ञान विज्ञान उपजले नाही असे समजा.तो मौनी बनून हट्ट करुन करुन मनात कैवल्या करीता प्रेम आणतो.कैवल्य उपजल्यावर जसे पाची इंद्रियांची वासना नष्ट होऊन जाते.तसे कृत्रिम रुपाने मनाला खेचून खेचून,घेरुन घेरुन पाची वासनांच्या पलिकडील कृत्रिम वैरागी बनतो व अशी कृत्रिम स्थिती आल्यावर मला पराभक्ती उपजून गेली असे मनाने समजून घेतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,पराभक्ती ज्या पुरुषाला उपजते त्यांची सर्व प्रथम पाची वासना पूर्णत: मिटून जाते नंतर त्यांना कैवल्य उपजते.ज्यांचे पाची इंद्रियांचे विषय तनात जिवंत आहे तोपर्यंत ते तनात उलटून सतस्वरुप आदि घरी पोहचले नाही हे समजा.त्यांनी पराभक्तचे स्वभाव पराभक्तांच्या ज्ञानात ऐकून ऐकून धारण केले आहे.त्यांचे हे स्वभाव पराभक्ता सारखे कुद्रती प्रगट झालेले नाहीत. ।।७।।

**बंदगी बंदगी करत रे ।। बासना सेंग जळ जाय नही रहे जा की ।।**
**तां दिना भक्त सो परा घट ऊपजे ।। क्रम जु एक ना रहयो बाकी ।।**
**पांच पैमाल पचीस सो मर रहया ।। तीन के ऊपरे जीण मांडे ।।**
**नवको आसरो लंगण को आवीयो ।। ता दिनां सरब सूं प्रित छाडे ।।**
**बिच में हटबिन बंदगी मून गहे ।। ताहे कूं ज्ञन नही परा आई ।।**
**दास सुखराम के करम कोई पूँचीयो ।। भ्रम सो ऊपजो मन मांई ।।८।।**

संताची सतस्वरुप रामनामाचे भजन करता करता सर्व पाची वासना जळून जातात. ह्या वासना जळून गेल्यानंतर त्याच्यात जराही कोणतेही वासना जिवंत राहत नाही. भक्ताची ज्या दिवशी अशी वेळ येते,त्या दिवशी त्या संताच्या घटात पराभक्ती प्रगट होऊन जाते मग त्याचे विषय वासनेचे एक ही कर्म बाकी राहत नाही.पराभक्ती प्रगटल्यावर त्याचे पाची विषय व पंचवीस विषय प्रकृत्या मरुन जातात.जसे घोडेस्वार घोड्यावर स्वार असतो तसे ते संत रजोगुण,तमोगुणाच्या वर स्वार राहतात.या गुणांना वासनांच्या कर्मांमध्ये लागू देत नाहीत.ते शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध,चित्त,मन,बुध्दी,अहंकार या नऊ तत्तच्या देहाला मारतात व त्याला मारुन सिध्दशिळा पार करतात.जसे विवाहीत पतीव्रता स्त्री विवाह झाल्यावर माहेर त्यागून पतीच्या घरी जाते व पतीचे सुख घेते. तिला पतीचे सुख समजल्यावर ती जशी माहेरची प्रीति त्यागून देते व पतीच्या प्रीति मध्ये रचमचून जाते तसेच पराभक्त सतस्वरुपात पोहचल्यावर विषय वासनांची प्रीति त्यागून सतस्वरुप विज्ञान वैराग्याच्या समाधी सुखात रचूनमचून जातो परंतु काही संत कैवल्य भक्ती न करता हट करुन पराभक्ती सारखे मौन धारण करुन घेतात त्यांना पराभक्तीचे कुद्रती ज्ञान आलेले राहत नाही.अशा संतांमध्ये मागच्या जन्माच्या कारणाने त्रिगुणी मायेचे कर्म प्रगटल्याने त्यांच्या मनात खरी पराभक्ती प्रगट न झाल्या कारणाने

पराभक्तीच्या प्रती भ्रम उत्पन्न होऊन जातो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।८।।

।। इति पराभक्ताच्या अंगाचे भाषांतर संपूर्ण ।।